पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ७६०            दिनांक - २५/१०/२०२३**

पी.सी.बी.गुन्हे शाखा,पुणे शहर

## बिबवेवाडी पोलीस ठाणे परिसरात हातभट्टीवाल्या अट्टल गुन्हेगारावर मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर यांची एम.पी.डी.ए.कायद्यान्वये ५१ वी स्थानबध्दतेची कारवाई

पुणे शहरातील बिबवेवाडी पोलीस स्टेशनचे हद्दीमध्ये गावठी हातभट्टी दारुचे गुन्हे करणारा अट्टल गुन्हेगार नामे **जालिंदर मसा मोरे,वय ४४ वर्षे,रा.३९/१४,२७६ ओटा अपर इंदिरानगर,बिबवेवाडी, पुणे** हा अभिलेखावरील सराईत गुन्हेगार आहे.त्याने त्यांचे साथीदारांसह बिबवेवाडी पोलीस स्टेशनच्या हद्दीत **गावठी हातभट्टी दारुचा साठा करुन विक्री करणे** यासारखे गंभीर स्वरुपाचे गुन्हे केले आहेत. मागील ०५ वर्षामध्ये त्यांचेविरूध्द ०६ गुन्हे दाखल आहेत. त्याच्या गुन्हेगारी कृत्यांमुळे सदर परिसरातील नागरीकांच्या आरोग्यास व जीवीतास धोका निर्माण होवून सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा निर्माण झालेली होती. तसेच त्याच्या दहशतीमुळे नागरिक उघडपणे तक्रार करणेस धजावत नव्हते.

बिबवेवाडी पोलीस स्टेशन यांनी सादर केलेला प्रस्ताव व सह कागदपत्रांची पडताळणी करुन मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर श्री.रितेश कुमार, यांनी नमूद इसमाचे विरुध्द एम.पी.डी.ए. कायद्यान्वये ०१ वर्षाकरीता स्थानबध्दतेचे आदेश पारीत केले असून,त्यास कोल्हापूर मध्यवर्ती कारागृह,कोल्हापूर येथे स्थानबद्ध करण्यात आले आहे.नमूद इसमास स्थानबध्द करण्यामध्ये वरिष्ठ पोलीस निरीक्षक,बिबवेवाडी पोलीस स्टेशन पुणे शहर श्रीमती सविता ढमढेरे, व वरिष्ठ पोलीस निरीक्षक,पी.सी.बी.गुन्हे शाखा,पुणे शहर श्री.ए.टी.खोबरे,व त्यांचे आधिपत्याखाली पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी कामगिरी पार पाडली.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर यांनी दहशत निर्माण करणाऱ्या तसेच अवैध बेकायदेशीर हातभट्टी दारु,ताडी निर्मिती व विक्री करणाऱ्या अट्टल गुन्हेगारांवर कडक प्रतिबंधक कारवाई करण्याचे धोरण अवलंबिले आहे. **मा.पोलीस आयुक्त यांनी कार्यभार स्विकारल्यानंतरची एम.पी.डी.ए.कायद्यान्वये स्थानबध्दतेची ही ५१ वी कारवाई असून**,यापुढेही सराईत व अट्टल गुन्हेगारांचे कृत्यांना आळा घालण्यासाठी प्रभावी प्रतिबंधक कारवाई करण्यात येणार आहे.